INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | MARCH – 2017

# सोलापूरातील भुयारी गटार योजना (इ.स. १८७६-२००२)

**Pro.Dr. Vandana Abhij Bhanap**
**Professor , DBF Dayanand College, Solapur.**

## प्रस्तावना :

सोलापूरात उघड्या गटारीमधून वाहणाऱ्या सांडपाण्यामुळे आरोग्यविघातक परिस्थिती निर्माण होत होती. घरोघर वापरात आणले गेलेले सांडपाणी, मैला व उद्योगामधील सांडपाणी याची योग्य व त्वरित विल्हेवाट करणे महत्वाची बाब आहे. इ.स. १८७६ मध्ये सॅनिटरी कमिशनर डॉ. ह्युलेट यांनी सोलापूर नगरपालिकेला भेट दिली. त्यावेळी त्यांनी आपल्या अहवालामध्ये तत्कालीन ड्रेनेज संबंधीची माहिती लिहून ठेवली आहे. त्यांनी ड्रेनेजसंबंधी केलेल्या वर्णनावरुन नगरपालिकेने दि. २४.१०.१८८२ रोजी एका सभेद्वारे शहरातील सांडपाण्याच्या योजनेवर चर्चा घडवून आणली. त्यामध्ये उघडी गटारे बंद करणे ही गटारे दगड-विटांनी पक्क्या स्वरुपात बांधणे असा निर्णय घेऊन नंतरच्या काळात त्याची कार्यवाही करण्यात आली. तरीही शहरात वापरलेले सांडपाणी वाहून नेण्यासाठी शास्त्रशुध्द पध्दतीची ड्रेनेज योजना अंमलात न आणल्याने डॉ. ह्युलेट यांनी इ.स. १८८६ मध्ये शहराला दुसऱ्यांदा भेट दिली आणि शहराच्या पाणीपुरवठ्यावर त्यांनी ताशेरे ओढले. शहरातील पाऊसाचे पाणी व वापरलेले पाणी वाहून नेण्यासाठी नगरपालिकेने २७,७७१ फूट लांब गटारे बांधण्यासाठी १०,४६२ रु. खर्च केले. त्यामुळे गटाराच्या सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत झाली. ह्या बांधलेल्या गटारामुळे त्या त्या भागातील लोकांच्या सुखसोयीत वाढ झाली आणि त्यांच्या आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली.



सोलापूर शहरामध्ये विविध उद्योगधंदे निर्माण झाल्याने त्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या वाढल्याने पुन्हा पाणी वाहून नेण्याचा प्रश्न निर्माण झाला. कामगारांची संख्या झपाट्याने वाढल्याने शहरात निर्माण केलेले ड्रेनेज व नाले कमी पडू लागले. शहरातील असणारा लेंडकी नाला व त्यातील घाण पाणी शहरातील रस्त्यावर येऊ लागल्याने आरोग्याची मोठी समस्या भेडसावू लागली. ह्याविषयी नगर आरोग्याधिकारी डॉ. बी.जी. केळकर यांनी सोलापूर नगरपालिकेचे लक्ष त्याकडे वेधले. इ.स. १९२४-२५ च्या अंदाजपत्रकात २५ हजार रुपयाची तरतूद करुन लेंडकी नाल्यात सुऊर लाईन्स टाकून नाल्यातून बाहेर पडणारे घाणपाणी बंद करण्यात आले. याचेच उदाहरण डोळ्यापुढे ठेवून शहरातील दक्षिण कसबा, उत्तर कसबा आणि ज्या ठिकाणी गड्डा यात्रा भरते तो विभाग लेंडकी नाल्याप्रमाणे दुरुस्त करण्यात आला.

नगरपालिकेने सार्वजनिक गटाराची व्यवस्था, सार्वजनिक संडासाची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था अशा सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्यानंतर इ.स. १८६५ च्या कल्पतरुच्या अंकात त्याविषयी गौरवाने उद्‌गार काढलेले आहेत. कल्पतरुने असे म्हटले होते की, "या शहराची स्थिती १५ ते २० वर्षापूर्वी अगदी गलिच्छ होती. अलिकडे मुन्सिपाल्टिच्या योगाने शहराची फार दुरुस्ती झाली आहे. जागोजागी सडका साफ असतात. पूर्वी ज्यांनी हे शहर पाहिले असेल त्यांनी आता पाहिले तर फार उत्तम दशेस आले असे वाटल्यास राहणार नाही."

याच दरम्यान इ.स. १९४५ मध्ये नगरपालिकेने भुयारी गटार योजनेचा प्रारंभ केला आणि उघड्या गटारी बंदिस्त करण्यास सुरुवात झाली. इ.स. १९६४ मध्ये नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले. त्यानंतर हे काम जोमाने पुढे नेले. इ.स. १९६४ पासून १९६८ पर्यंत १,४५४ घरांना भुयारी गटारांचे कनेक्शन दिले गेले. एकंदर ४५,००० फूट लांबीची ड्रेनेज लाईन टाकण्यात आली. यासाठी रु. ५,००,०००/- रु. खर्च करण्यात आले. शिवाय इ.स. १९६८ पासून सांडपाण्याबरोबर पाणीही भुयारी गटारातून काढून लेंडक्यातून सोडण्याच्या योजनेस प्रारंभ झाला. अशा प्रकारची

व्यवस्था प्रभात टॉकीज ते हुतात्मा चौक या रस्त्याच्या बाजूने व कोंतम चौकाजवळ केली. यासाठी ४० लाख रु. खर्च आला.

## १. देगांव सुएज ट्रिटमेंट प्लँट : १९६८

याच दरम्यान म्हणजे इ.स. १९६८ रोजी सोलापूर शहराच्या पश्चिमेस देगांव येथे ५४ एम.एल.डी. क्षमतेचा देगांव सुएज ट्रिटमेंट प्लँट उभारण्यात आला. शहरातील सांडपाण्याचे नळ टाकण्याचे काम पुरे केले. त्याकरिता जवळ जवळ २० लक्ष रुपये खर्च झाला. लक्ष्मी मिलच्या पाठीमागे रेल्वे लाईन्स ओलांडून पुढे देगांवपर्यंत नळ टाकणे व शुध्दीकरण विभाग बांधणे हे काम महाराष्ट्र सरकारने पुरे केले. सरकारवर सोपविलेल्या कामाकरिता एकूण ५३,४९,७३४ रु. खर्च येणार होता. त्यापैकी १/३ रक्कम सरकारी मदत म्हणून नगरपालिकेस मिळाली. बाकीचे ३५,३६,४८९/- रु. नगरपालिकेने खर्च केला आहे. कामाचे स्वरुप खालील प्रकारचे आहे.

१) शहराच्या प्रत्येक गल्लीतील सांडपाणी, मैला वगैरे लक्ष्मी मिलपर्यंत वाहून नेण्याकरिता नळ टाकणे हे काम नगरपालिकेने पुरे केले आहे.

२) लक्ष्मी मिल जवळ एकत्रित झालेले सांडपाणी वगैरे पुढे देगांव पर्यंत वळवून नेण्याकरिता ६६ इंची, ७२ इंची व ७८ इंची नळ टाकणे व तेथे शुध्दीकरण विभाग बांधणे ही कामे सरकारने हाती घेतली.

सोलापूरचे पाणी सीना नदीस मिळणार नाही. त्यामुळे या नदीकाठच्या १०-१२ खेड्यांच्या पाणी पुरवठ्यात सांडपाणी मिसळल्यामुळे बिघाड झाला नाही. हे सांडपाणी शेतीस दिले गेले. यामुळे सुमारे एक हजार एकर जमिन बारमाही लागवडीखाली आली, शेतीचे उत्पन्न वाढले. दरसाल अंदाजे ३,००० टन उत्कृष्ठ खत मिळून महानगरपालिकेस उत्पन्न मिळत गेले. भंगी लोकांवर होणाऱ्या खर्चात कपात  झाली.

## २. भुयारी गटार योजना : १९७२-७३

इ.स. १९७२-७३ मध्ये शहरात ज्या ठिकाणी भुयारी गटारांची कामे झाली नव्हती अशा ठिकाणी म.न.पा. ने स्वखर्चाने कामे केली. तसेच खाजगी ले-आऊटच्या मालकाकडून 'डिपॉझिट कॉन्ट्रीब्युशन वर्क' च्या रकमेतून ले-आऊट मधील भुयारी गटारे बांधण्याची कामे केली गेली. सदरील कामामुळे शहराच्या आरोग्यामध्ये भर पडली असून, बऱ्याच ठिकाणी कुंडा टाईप संडासचे प्लशींग संडास करणे सोयीचे झाले. या नवीन सुअर लाईनची लांबी ४,७३८ फूट असून, त्यासाठी ५२,१८२ रु. इतका खर्च आला होता. याशिवाय याच वर्षी गरीब व ज्यांचे उत्पन्न १८००/- रु. चे आत आहे. अशा घरमालकासाठी येणाऱ्या खर्चासाठी १२ हप्त्याची योजना केली. यामध्ये ड्रेनेज कनेक्शनसाठी येणारा खर्च १२ हप्त्यात भरण्याची सवलत दिली गेली. ऐपत नसणाऱ्यांसाठ मनपा ने चांगली सोय केली. अशी ५६ कनेक्शन्स इ.स. १९७२-७३ मध्ये केली गेली. याशिवाय अप्पर लेंडकी नाला बुधवार बाजार, हैद्राबाद पुल ते सिव्हील हॉस्पिटल रोड नाला, ३,५०६ रनिंग फूट, सदर बझार नाला, २,३५० फूट, रुपाभवानी नाला इत्यादिचे नाला ड्रेनिंग करण्यात आले.

## ३) ड्रेनेज योजना : १९८५-८६

इ.स. १९७२-७३ नंतर साधारणपणे तेरा वर्षाच्या काळात वाढलेली लोकसंख्या पाणी पुरवठा, उद्योगधंदे, कारखान्यामध्ये झालेली वाढ, कुंडा टाईप संडासचे प्लॅश टाईप मध्ये झालेले मोठ्या प्रमाणातील रुपांतर, यामुळे ड्रेनेज व्यवस्था अपूरी पडू लागली. सद्यस्थिती व भविष्यकाळात होणारी शहराची वाढ लक्षात घेऊन सो.म.पा. ने २१/०४/१९८६ रोजी ड्रेनेजची संपूर्ण योजना तज्ञांकडून करुन घेणेसंबंधी ठराव संमत केला. त्या अनुषंगाने टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, मुंबई यांचेकडे पत्रव्यवहार करुन व स्थायी समितीचे दि. ३०/०४/१९८६ चे ठरावनुसार हे काम पत्रव्यवहार करुन सोपविण्यात आले. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्सनी इ.स. २०१५ पर्यंत शहराची वाढ, लोकसंख्या, पाणी पुरवठा, उद्योगधंदे इत्यादि बाबींचा विचार करुन जलनित्सारण सुधारणा योजना तयार करुन दिली. इ.स. १९९२-९३ ते १९९५-९६ या चार वर्षात सोलापूर महानगरपालिकेने नव्याने मलवाहिन्या ड्रेनेज लाईन्स टाकल्या होत्या. इ.स. १९९२-९३ या वर्षात विविध मिलीमिटर व्यासाच्या पाईप लाईन्स एकूण २,०४० रनिंग मिटर्स टाकल्या होत्या. त्यासाठी एकूण खर्च १०,०२,७००/- रु. आला होता. अशाच प्रकारे इ.स. १९९३-९४ या वर्षात ६,०३० पाईप लाईन्स रनिंग मिटर्स, त्यासाठी खर्च ३०,६९,९९५ रु., इ.स. १९९४-९५ या वर्षात ५,५८८ पाईप लाईन्स रनिंग मिटर्स, त्यासाठी खर्च १४,१४,२८१/- रु., आणि इ.स. १९९५-९६ या वर्षात ३,६६७ पाईप लाईन्स रनिंग मिटर्स, त्यासाठी खर्च २९,३९,३०५/- रु. आला होता.[८३] इ.स. १९९२-९३ मध्ये ४२५ ड्रेनेज कनेक्शन व या ड्रेनेज लाईन्सवर ६१ जादा मॅनहोल्स बांधण्यात आले. इ.स. १९९३-९४ मध्ये ३१२ ड्रेनेज कनेक्शन व २२ जादा, मॅन होल्स, इ.स.

१९९४-९५ मध्ये ४०५ कनेक्शन व १६ जादा मॅन होल्स, इ.स. १९९५-९६ मध्ये ३७४ ड्रेनेज कनेक्शन व ४३ जादा मॅन होल्स बांधण्यात आले. ही कामे सातत्याने होत होती. तसेच वाढत्या लोकसंख्येनुसार ही कामे देखील वाढत गेली.

इ.स. १९९८ ते २००२ पर्यंत ड्रेनेज कनेक्शन, स्टॉर्म वॉटर लाईन्स बांधणी तसेच अस्तित्वात असलेल्या मलवाहिन्यांची निगा व काळजी, दुरुस्ती करणे, जादा मॅनहोल बांधणे, साफसफाई, गाळ काढणे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, संडास इत्यादि ड्रेनेज जोडून दिले. यामुळे नागरी आरोग्य सुस्थितीत राहण्यास मोलाचा हातभार लागला.

सिंधू संस्कृतीतील योजनाबध्द नगररचना व बंदिस्त भुयारी गटारांची व्यवस्था समकालीन इतर कोणत्याही संस्कृतीत दिसत नाही. सिंधू संस्कृतीत लोकांच्या आरोग्य रक्षणाची विशेष काळजी घेतली जात होती हे त्यावेळच्या नगररचना व भुयारी गटारंच्या व्यवस्थेवरुन दिसून येते. त्याचाच वारसा सोलापूरकरांनी जपला आहे हे ह्यावरुन दिसते.

## संदर्भ

१) सोलापूर महानगरपालिका २००२ स्मरणिका पृ. ७२.
२) दैनिक सकाळ दि. २८/०४/२०१२.
३) सोलापूर महानगरपालिका तत्रैव १९२४, २५.
४) सोलापूर महानगरपालिका महापौर सुवर्ण चषक स्पर्धा, १९९३.
५) सोलापूर महानगरपालिका वार्षिक अहवाल १९६८, पृ. ६७.
६) सोलापूर महानगरपालिका महापौर सुवर्ण चषक १९९३.